# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (खुद्द), मंत्रालय

# नागरिकांची सनद

**प्रस्तावना :-**

सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्रमांक शाकानि-१०९५/ सीआर-२८९/१८ (र. व का.), दिनांक ९ नोव्हेंबर, १९९५ नुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग असा नवीन मंत्रालयीन प्रशासकीय विभाग निर्माण करण्यात आला आहे. उक्त अधिसूचनेन्वये या विभागाकडे खालीलप्रमाणे विषय सोपविण्यात आले आहेत.

**विषयसूची :-**

१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (खुद्द) ची आस्थापना, विभागाच्या अधिपत्याखालील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची व जिल्हा परिषदांच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागांची आस्थापना.

२) ग्रामीण जनतेस शुध्द व पुरेसे पिण्याचे पाणी पुरविण्याकरिता धोरण ठरविणे.

३) नागरी व ग्रामीण भागातील स्वच्छता कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषदा आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचे कामाचे समन्वयन व सनियंत्रण करणे.

४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वैधानिक, घटनात्मक, धोरणविषयक आणि आस्थापना विषयक प्रकरणांवर कार्यवाही करणे.

**विभागाची मुख्य कार्ये :-**

१) पाणी पुरवठा व मल:निस्सारण तसेच स्वच्छता विषयक कार्यक्रमाचे धोरण ठरविणे व अंमलबजावणी यंत्रणेशी समन्वय साधून सनियंत्रण करणे.

२) पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक कार्यक्रमाबाबतचे अंदाजपत्रक तयार करुन निधीची तरतूद करणे.

३) राज्यातील नागरी व ग्रामीण पुरवठा व मल:निस्सारण कार्यक्रम काही ठिकाणी थेट स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत व काही ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविणे.

४) ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक कार्यक्रम जिल्हा परिषदेकडील ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत राबविणे.

५) भूगर्भातील पाण्याचे सर्वेक्षण, संवर्धन व नियंत्रण विषयक बाबी क्षेत्रीय स्तरावर भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचेमार्फत हाताळणे.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व राज्य शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी विभागांतर्गत खालील क्षेत्रीय कार्यालये, प्राधिकरण व संस्था कार्यरत आहेत.

**(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.**

**(२) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा.**

**(३) राज्य पाणी व स्वच्छता मिशन**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात पाणी व स्वच्छता विभागाच्या योजनांची अंमलबजावणी व सनियंत्रणाचे कामकाज हाताळण्यासाठी दिनांक १२ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये पाणी व स्वच्छता सहाय संस्थेची स्थापना करण्यात आली होती. तथापि, विभागाच्या दिनांक ४ सप्टेंबर २०२० अन्वये, जल जीवन मिशन अंतर्गत राज्य पाणी व स्वच्छता मिशनची स्थापन करण्यात आलेली असून, यामध्ये पाणी व स्वच्छता सहाय संस्था विलीन करण्यात आलेली आहे. सदर संस्था मिशन संचालक यांच्या नियंत्रणाखाली आहे. राज्य पाणी व स्वच्छता मिशनचे कार्यालय सिडको भवन (दक्षिण कक्ष), पहिला मजला, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४ येथे आहे.

**<u>विभागाची संरचना</u> :-**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत प्रामुख्याने ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा आणि ग्रामीण व नागरी स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम इत्यादि बाबींवर धोरणात्मक निर्णय घेतले जातात. शासन स्तरावर या विभागाचे प्रमुख मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) आहेत. प्रशासकीय पातळीवर सद्यस्थितीत प्रधान सचिव हे विभाग प्रमुख आहेत. त्यांच्या नियंत्रणाखाली सह सचिव/उप सचिव/मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी/अवर सचिव/कक्ष अधिकारी व इतर कर्मचारीवर्ग कार्यरत आहे. विभागाशी संबंधित कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यासननिहाय विषयवाटप करण्यात आलेले आहे. त्यानुसार नागरिकांना त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधित अवर सचिव/कक्ष अधिकारी यांच्याकडून मागवून घेता येईल तसेच तक्रारी/निवेदने देऊन त्याचे निराकरण करुन घेता येईल.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची कार्यालये खालील ठिकाणी कार्यरत आहेत.

(१) गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा व ८ वा मजला, क्रॉफर्ड मार्केटजवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.

(२) राज्य पाणी व स्वच्छता मिशन, पहिला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई ४०० ६१४

| **नियंत्रण अधिकारी** | **कार्यासन क्रमांक** | **संबंधित अधिकारी** | **कार्यासनातील विषय** |
|---|---|---|---|
| उप स तथा अभियान संचालक | पापु-१६ | अवर सचिव / कक्ष अधिकारी | स्वच्छ भारत अभियानांतर्गत धोरणात्मक बाबी/निधी वितरण |
| | पापु-०८ | अवर सचिव / कक्ष अधिकारी | स्वच्छ भारत अभियानांतर्गत योजनांची अंमलबजावणी |
| उप सचिव | पापु-०१ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | विभाग (खुद्द) ची आस्थापना |
| | पापु-०२ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | विभागी (खुद्द) ची नोंदणी शाखा |
| | पापु-०३ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | विधीमंडळ कामकाजाचे समन्वय |
| | पापु-०५ | सांख्यिकी अधिकारी | सांख्यिकी शाखा |

| | | | |
|---|---|---|---|
| | पापु-१४ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | टंचाई निवारण कार्यक्रम. |
| | पापु-१५ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची आस्थापना व भूजल अधिनियमासंदर्भात कामकाज |
| | पापु-१९ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम, अटल भूजल योजना/ भूजल धोरण |
| | पापु-२० | लेखा अधिकारी | लेखा परिक्षणाच्या बाबी |
| | पापु-२२ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | नागरी स्वच्छता कार्यक्रम व नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजना, नवबौद्ध कुटुंबांना खाजगी नळ जोडण्या व अनुषंगिक विषय<br>नागरी पाणी पुरवठा व मल:निस्सारण + स्वजल |
| | संगणक शाखा | अवर सचिव / कक्ष अधिकारी | विभागाचे संगणकीकरण बाबत |
| | पापु-२३ | अवर सचिव / कक्ष अधिकारी | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आस्थापना व जि.प.(ग्रा.पा.पु.) विभागाची आस्थापना |
| | रोखशाखा | अवर सचिव | विभागाची रोखशाखा |
| सह सचिव | पापु-०४ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | अर्थसंकल्पिय शाखा |
| | | अवर सचिव/कक्ष अधिकारी | जल जीवन मिशन, छत्रपती संभाजीनगर, विभागातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसंबंधी बाबी |
| | पापु-०७ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या धोरणात्मक बाबी |
| | | अवर सचिव/कक्ष अधिकारी | जल जीवन मिशन, छत्रपती संभाजीनगर, विभागातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसंबंधी बाबी |
| | पापु १० | अवर सचिव/कक्ष अधिकारी | जल जीवन मिशन योजनांसंबंधी निधी वितरण |
| | पापु-१२ | अवर सचिव / कक्ष अधिकारी | पाणी गुणवत्ता व संनियंत्रण |
| | पापु-१३ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | अमरावती विभागातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसंबंधी बाबी |
| | पापु-१७ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | नागपूर विभागातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसंबंधी बाबी |

| | | | |
|---|---|---|---|
| | पापु-१८ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | नाशिक विभागातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसंबंधी बाबी |
| | पापु-१९ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम |
| | पापु-२२ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | पुणे विभागातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसंबंधी बाबी |
| सहसचिव (भा.प्र.से) | पापु ०६ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | कोकण, अमरावती, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर व नागपूर या महसुली विभागांशी संबंधीत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसंबंधी बाबी (राज्य पाणी व स्वच्छता मिशन) |
| मिशन संचालक | पापु-११ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | |
| | पापु-२५ | अवर सचिव/कक्ष अधिकारी | राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या आस्थापना विषयक बाबी |

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण :-**

राज्यातील नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा आणि मल:निस्सारण कार्यक्रमांचे जलदगतीने विकास व विनिमय करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र पाणी पुरवठा व जल:निस्सारण मंडळ अधिनियम, १९७६ अन्वये दिनांक १ जानेवारी, १९७७ पासून महाराष्ट्र पाणी पुरवठा व जल:निस्सारण मंडळाची स्थापना करण्यात आली होती. सन १९९७ मध्ये सदर अधिनियमात सुधारणा करण्यात येऊन महाराष्ट्र पाणी पुरवठा व जल:निस्सारण मंडळाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण असे नामकरण करण्यात आले.

मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतन दिनांक २३ मार्च, २०१७ पासून पुढे शासनामार्फत अदा करण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्यालय मुंबई येथे सदस्य सचिव यांच्या नियंत्रणाखाली आहे. मुख्य अभियंत्यांची विभागीय कार्यालये पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व ठाणे येथे कार्यरत असून त्यांच्या नियंत्रणाखाली त्या विभागातील जिल्हे आहेत.

**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा :-**

महाराष्ट्र शासनाने आंतरराष्ट्रीय विकास संस्थेशी (जागतिक बँक प्रकल्प) केलेल्या कृषी पत प्रकल्प कराराची परिणिती म्हणून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा दिनांक १६ जुलै, १९७१ पासून अस्तित्वात आली. कृषी विभाग, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय तसेच पाटबंधारे विभाग यांचेमार्फत करण्यात येणाऱ्या भूजल सर्वेक्षण व विकास याबाबतची कामे सदर यंत्रणेकडे सोपविण्यात आली. सुरुवातीला ही यंत्रणा भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाचा एक घटक होती. परंतु दिनांक १५ नोव्हेंबर, १९७२ पासून या यंत्रणेला शास्त्रीय तत्वावर खालील योजना कार्यान्वित करण्यासाठी संचालनालयाचा स्वतंत्र दर्जा देण्यात आला.

(अ) भूजल विषयक सर्वेक्षण करणे.

(ब) भूजलाचे मुल्यांकन, भूजल संवर्धन, भूजल व्यवस्थापन.

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ हा दिनांक १ जून, २०१४ पासून

राज्यात लागू झालेला आहे. सर्व प्रकारच्या भूजल वापरकर्त्यांना सातत्यपुर्ण भूजल उपलब्ध व्हावे तसेच सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत संरक्षित करता यावे, यासाठी लोकसहभागातून मागणी व पुरवठा आधारीत उपाययोजना करुन, भूजल विकास व व्यवस्थापन लोकसहभागातून करण्याचे उद्दिष्ट सुधारीत कायद्यात ठेवण्यात आले आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे मुख्यालय पुणे येथे संचालकांच्या नियंत्रणाखाली आहे. तसेच उपसंचालकांची विभागीय कार्यालये पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती व कोकण (नवी मुंबई) येथे कार्यरत असून, त्यांच्या नियंत्रणाखाली त्या त्या विभागातील जिल्हे आहेत. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची कार्यालये सर्व जिल्हयात वरिष्ठ भूवैज्ञानिक यांच्या नियंत्रणाखाली आहेत.

**राज्य पाणी व स्वच्छता मिशन :-**

राज्य पाणी व स्वच्छता मिशनची कार्ये व जबाबदारी :-

१) ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्राच्या कार्यप्रणाली विषयक (Software Aspects) बाबी हाताळणे.

२) शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (खुद्द), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा आणि जिल्हा परिषद यामधील दुवा म्हणून काम करणे.

३) पंचायत राज संस्था आणि ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांना जल सुरक्षा योजना तयार करणे, जल सुरक्षा योजनेवर आधारीत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी व देखभाल दुरुस्तीकरिता सहाय्य करणे.

४) मनुष्यबळ विकास व माहिती शिक्षण व संवाद यामधील कामे हाती घेणे.

५) पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाचे मुल्यमापन व परिणाम निर्धारण अभ्यास करणे, संशोधन व विकास यामधील कामे हाती घेणे व त्यातील निष्कर्षांच्या आधारे विविध कार्यक्रमात सुधारणा करण्यासाठी ते शासनास सादर करणे.

६) पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण आणि इतर बाबीकरिता एमआयएस व संगणकीकरण, GIS Mapping आणि Online सनियंत्रण पध्दती विकसित करणे.

७) जल जीवन मिशन व संपुर्ण स्वच्छता कार्यक्रम इत्यादिचे भौतिक व आर्थिक सनियंत्रण करणे, आढावा घेणे.

८) जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन आणि संसाधन केंद्रे यामधील सल्लागार व कर्मचारी यांच्या कामकाजाचे सनियंत्रण व समन्वय करणे.

९) जल जीवन मिशन व संपुर्ण स्वच्छता कार्यक्रम इत्यादिच्या संदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व जिल्हा परिषद यांच्याशी समन्वय साधणे.

१०) केंद्र व राज्य शासन यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशांचे पालन करणे.

**विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या महत्वाच्या योजना :-**

**(१) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम :-**

महाराष्ट्रासारखे पुरोगामी राज्य ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या सुविधेकरिता पुर्णत: केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमावर अवलंबून होते. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाणी पुरवठयाची स्थिती लक्षात घेऊन मा. मंत्रीमंडळाने दिनांक ६ एप्रिल, २०१६ च्या बैठकीत दिलेल्या

मान्यतेनुसार राज्यातील ग्रामीण भागातील पाणी पुरवठा क्षेत्रात सुधारणा करण्याच्या उद्देशाने व ग्रामीण जनतेस पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक ७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये **"मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम"** या नावाखाली सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीसाठी राज्य शासनाचा स्वत:चा असा ग्रामीण पाणी पुरवठयाचा कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सद्य:स्थितीत मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजुरी देण्यात आलेल्या प्रगतीपथावरील व अपुर्ण पाणी पुरवठा योजनांची कामे पुर्ण करण्यासाठी या योजनेस प्रथमत: दोन वर्षे (सन २०२१-२२ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर मुदतवाढ संपुष्टात आल्यानंतर मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक ०६ जुन २०२२ रोजीच्या बैठकीत सदर कार्यक्रमातंर्गत मंजुरी देण्यात आलेल्या प्रगती पथवरील/ अपुर्ण पाणी पुरवठा योजनांची कामे पुर्ण करणेकरीता प्रस्तुत कार्यक्रमास १ वर्ष म्हणजेच दिनांक ३१.०३.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) <u>अटल भूजल योजना :-</u>

भुजलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी जागतीक बँक सहाय्यतीत अटल भूजल योजनेंची (अटल जल) अंमलबजावणी भारत सरकार मार्फत करण्यात येत आहे. देशाच्या सात राज्यामंध्ये अटल भूजल योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधी आणि नेतृत्व केंद्र शासनाचा जल शक्ती मंत्रालय, जल संसाधन, नदी विकास और गंगा सरंक्षण तसेच पेयजल व स्वच्छता विभाग, (DoWR, RD&GR) करत आहे. प्रत्येक सहभागी राज्यात केंद्रीय भूजल मंडळाने (सीजीडब्ल्युबी) परीभाषीत केल्यानुसार, अति-शोषीत, शोषीत आणि अंशत: शोषीत पाणलोट क्षेत्रावर लक्ष केंद्रीत केले आहे. अटल भूजल योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यात रुपये १८८.२६ कोटी अनुदान व रुपये ७३७.५१ कोटी कार्यकामाच्या उद्दीष्टपुर्तीस बांधलेल्या निकषानुसार प्रोत्साहन अर्थसहाय्य म्हणुन तरतुद केली आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्यातील १३ जिल्हयातील, ३८ तालुक्यातील, ७३ पाणलोट क्षेत्रातील, १३३९ ग्राम पंचायत मधील १४४३ गावांची निवड करण्यात आली आहे. राज्यातील अटल भूजल योजनेच्या अंमलबजावणीकरीता भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची (GSDA) प्रकल्प अंमलबजावणी एजन्सी (पीआयए) म्हणुन निवड केलेली आहे. या योजनेचा कालावधी हा दिनांक ०१.०४.२०२० ते दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत म्हणजे ५ वर्ष आहे.

<u>(३) सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांच्या नोंदींबाबत -</u>

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत Geo-tagging करण्यात आलेल्या सार्वजनिक पाणी पुरवठा योजना व उपांगे तसेच, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्रोत यांची तालुकानिहाय संख्यात्मक माहिती केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर (IMIS) अद्यायावत करणे, गावातील विविध योजनांतर्गत नव्याने कायान्वित सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची व कायमस्वरुपी बंद स्त्रोतांची पंचायत समिती स्तरावरुन प्राप्त माहिती केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर (IMIS) अद्यायावत करणे, सर्व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्रोत व पाणीपुरवठा योजनांची उपांगे Geo-tagging करणे व त्याची माहिती केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर (IMIS) अद्ययावत करणेसकार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा), जिल्हा परिषद यांना सोपविणेबाबतच्या सूचना शासनाच्या दि.२२.७.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

<u>(४) पाणी गुणवत्ता तपासणी -</u>

पाणी गुणवत्ता तपासणी करीता भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांच्या अधिनस्त राज्यात ६ विभागस्तरीय, २८ जिल्हास्तरीय व १४३ उपविभागीय प्रयोगशाळा कार्यरत आहेत. त्यापैकी राज्यातील ६ विभागस्तरीय व २८ जिल्हास्तरीय प्रयोगशाळांचे NABL अधिस्वीकृतीकरण करण्यात आले असून, १४३ उपविभागीय प्रयोगशाळांपैकी ५१ प्रयोगशाळांचे NABL recognition झाले असून, उर्वरीत प्रयोगशाळांचे NABL recognition करण्याचे काम प्रगतीत आहे. सदर प्रयोगशाळांकडून पाण्याची वर्षातून एकदा रासायनिक तपासणी व दोनदा जैविक तपासणी करण्यात येते.

ग्रामपंचायत स्तरावर पाणी गुणवत्ता तपासणीकरिता जैविक FTK - H2S vials चा वापर, खरेदी व वितरणाबाबत शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. डब्ल्यूक्यूएम २०१९/प्र.क्र.८५/पापु-१२, दि.०२.०२.२०२२ अन्वये कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून, यामध्ये ग्रामपातळीवर स्वच्छ व शुद्ध पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्याकरीता ग्रामपंचायतीमधील पाण्याच्या नोंदणीकृत पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताची/ वितरण बिंदुंच्या पाणी नमुन्याची गावातील प्रशिक्षित महिला स्वयंसेवकांमार्फत प्रत्येक महिन्यातून एकदा जैविक क्षेत्रीय तपासणी संचाच्या (Field Test Kits) मदतीने तपासणी करणे, पिण्याच्या पाण्याचा नमुना अयोग्य आल्यास संबंधित ग्रामपंचायतीमार्फत समस्या निवारण्यासंबंधी तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

**(५) <u>सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सनियंत्रणाखालील पाणी गुणवत्ता तपासणीप्रयोगशाळा पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या सनियंत्रणाखाली घेणेबाबत</u> :-**

पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच पाणी गुणवत्ता प्रयोगशाळांच्या कामात सुसुत्रता येण्यासाठी व योग्य प्रकारे सनियंत्रण होण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सनियंत्रणाखालील ३४ जिल्हा प्रयोगशाळेतील कंत्राटी मनुष्यबळ (रसायनी व डेटा एंट्री ऑपरेटर), १३८ उप विभागीय प्रयोगशाळा, साहित्य, मनुष्यबळासह व नव्याने स्थापन होणाऱ्या १० उप विभागीय प्रयोगशाळांसाठी प्राप्त झालेल्या निधीसह ताब्यात घेण्यास दिनांक १८ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच १३८ उप विभागीय पाणी तपासणी प्रयोगशाळा पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत असलेल्या भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत.

**(६) <u>स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)</u> :-**

राज्यात दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) ही केंद्र पुरस्कृत महत्वाकांक्षी योजना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत राबविण्यात येत आहे.

सन २०१२ मध्ये झालेल्या पायाभूत सर्वेक्षणानुसार, महाराष्ट्रातील ५९,५५,२३२ कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालये नव्हती. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत सन २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणातील शौचालये नसलेल्या कुटुंबांना शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येऊन, दिनांक १८/४/२०१८ रोजी संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्र राज्य पायाभूत सर्वेक्षणानुसार हागणदारीमुक्त झाल्याचे घोषित करण्यात आले आहे. त्यानंतर पायाभूत सर्वेक्षणातून सुटलेल्या व पायाभूत सर्वेक्षणाबाहेरील वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध नाहीत, अशा पात्र कुटूंबाचा शोध घेऊन, त्या एकूण १०,५१,१७४ पैकी १०,५१,१७४ कुटुंबांच्या वैयक्तिक शौचालयांची बांधकामे पूर्ण करण्यात आली.

i. **स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२**

केंद्र शासनाने जुलै, २०२० मध्ये स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ च्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून, सदर सूचनांनुसार या योजनेंतर्गत कार्यवाही करावयाची आहे. संपूर्ण ग्रामीण स्वच्छता व स्वच्छता शाश्वत टिकविण्याच्या अनुषंगाने, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत ग्रामीण भागातील सार्वजनिक शौचालय बांधकाम, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबरधन,मैला गाळ व्यवस्थापन,प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन या बाबींचे नियोजन करण्यात येत आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), टप्पा-२ अंतर्गत करावयाची प्रक्रिया, निकष याबाबत विस्तृत विवेचन मार्गदर्शक सूचनांमध्ये करण्यात आले आहे. केंद्र शासनाने नव्याने अस्तित्वात येणारी कुटुंबे, पहिल्या टप्प्यामध्ये सुटलेल्या तथापि, पात्र असलेल्या कुटुंबांचा शोध घेऊन, कोणीही शौचालयांपासून वंचित राहणार नाही, याची खात्री करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार नवीन कुटुंबांच्या वैयक्तिक शौचालय बांधकामाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्य मंत्रीमंडळाच्या दिनांक २८/०७/२०२१ च्या बैठकीत राज्यात केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण), टप्पा-२ ही योजना आर्थिक वर्ष २०२०-२१ ते २०२४-२५ पर्यंत राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण), टप्पा-२ च्या अंमलबजावणीबाबत, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या, दिनांक ११/१०/२०२१ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक १२/४/२०२२ च्या शासन निर्णयान्वये स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत सार्वजनिक शौचालय बांधकामाबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक १८/१०/२०२१, २६/११/२०२१ व २/१२/२०२१ च्या शासन निर्णयान्वये तसेच, दिनांक ४/११/२०२२ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा २ अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक २९/१०/ २०२१ च्या शासन निर्णयान्वये स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत गावे हागणदारीमुक्त अधिक (ODF +) म्हणून जाहीर करण्यासाठी व पडताळणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत खालील मुख्य घटकांना केंद्र शासनाच्या निर्देशानुसार पुढील प्रमाणे अनुदान अनुज्ञेय आहे :-

| **घटक** | **अनुदानाची रक्कम** |
|---|---|
| १.दारिद्रय रेषेखालील सर्व कुटुंबे व दारिद्रयरेषेवरील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, लघु शेतकरी,सिमान्त शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, शारीरिकदृष्टया अपंग आणि महिला कुटुंब प्रमुख यांनी, वैयक्तिक स्वच्छतागृह बांधून वापर सुरु केल्यास, | पात्र लाभार्थी कुटुंबाला रू. १२,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २.घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन | ग्राम पातळीवर यापैकी ३०% रक्कम ग्रामपंचायतीने १५ व्या वित्तआयोगाकडून मिळालेल्या अनुदानातून खर्च करणे | ५००० पर्यंत लोकसंख्येच्या गावात घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रतिव्यक्ती रु. ६०/- व सांडपाणी व्यवस्थापनासाठी प्रति व्यक्ती रु . २८०/- | |
| | | ५००० पेक्षा अधिक लोकसंख्येच्या गावात घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रतिव्यक्ती रु.४५/- व सांडपाणी व्यवस्थापनासाठी प्रतिव्यक्ती रु.६६०/- | |
| | जिल्हा पातळीवर | प्लॅस्टीक कचरा व्यवस्थापन युनिट करीता (प्रत्येक तालुक्यामध्ये १) | रु.१६.०० लक्षपर्यंत |
| | | मैला व्यवस्थापन | प्रतिव्यक्ती रु.२३०/- पर्यंत |
| | | गोबरधन प्रकल्प (फक्त जिल्हा स्तरावर १) | रु. ५०.०० लक्षपर्यंत (प्रति जिल्हा) |
| ३. सामुदायिक स्वच्छता संकुल | | रू. ३.०० लक्ष यापैकी ३० टक्के रक्कम ग्रामपंचायतीने १५ व्या वित्त आयोगाकडून मिळालेल्या अनुदानातून खर्च करणे आवश्यक | |
| ४.माहिती, शिक्षण व संवाद तसेच मनुष्यबळ विकास | | एकूण खर्चाच्या ३ टक्के | |
| ५.प्रशासकीय खर्च | | एकूण खर्चाच्या १ टक्के | |
| ६.फिरता निधी | | प्रकल्प खर्चाच्या ५ टक्के मात्र प्रति जिल्हा जास्तीत जास्त रू. १.५० कोटी | |
| ७.फ्लेक्सीफंड | | स्थानिक पातळीवरील गरजा भागविण्यासाठी राज्य स्तरावर नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान विकासासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार फ्लेक्सी फंड वापरता येईल. | |

नाली बांधकामासाठी स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ या अभियानांतर्गत खर्चासाठी निधी अनुज्ञेय नसून, १५ व्या वित्त आयोगाचा तसेच मनरेगा मधून प्राप्त निधी वापरावयाचा आहे. तसेच अन्य राज्यस्तरीय/केंद्राच्या योजनांमधून मिळणारा निधी, खासदार/आमदार,सीएसआर निधी, इ. मार्गाने मिळणाऱ्या निधीतून अधिक अनुदान देण्याची मुभा राज्य शासनाला असेल.

ii. **संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान**

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा मूळ उद्देश ग्रामीण जनतेच्या आरोग्यमानाचा दर्जा उंचावण्याचा आहे. स्वच्छतेच्या सवयी अंगिकारून ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्यमान,जीवनस्तर उंचावण्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणा-या अभियान/कार्यक्रमामध्ये निर्माण होणाऱ्या स्वच्छतेसंबंधी मत्ता, गावांमध्ये तयार होणाऱ्या स्वच्छतेच्या नव्या सुविधा, नागरिकांचे स्वच्छतेबाबतीत होणारे मत परिर्वतन व गावांगावांतून

सुरु असलेल्या स्वच्छतेच्या चळवळीत ग्रामीण भागातील सर्व नागरीक व ग्रामस्थांचा सक्रिय व सातत्यपूर्ण सहभाग घेवून, त्यांच्या वेगवेगळया ग्रामपंचायती,तालुके व जिल्ह्यांत स्वच्छतेच्या विविध पैलूंतील प्रगतीबाबत एक सर्वसमावेशक स्पर्धा राबवून व त्या माध्यमातून ग्रामस्थांना प्रोत्साहित करून, या कार्यक्रमाचे आपलेपणा व महत्व पटवून देण्याकरिता सन २०००-०१ पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. तसेच सन २००२-०३ पासून स्वच्छतेशी व ग्रामविकासाशी निगडीत एखाद्या विशिष्ट क्षेत्रात भरीव काम करणा-या ग्रामपंचायतींना तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विशेष बक्षिसे देण्याचा उपक्रमही सुरु करण्यात आला आहे.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात सुटसुटीतपणा, अधिक सोपेपणा, पारदर्शकता व या अभियानाची व्याप्ती वाढवून महाराष्ट्र राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी सहभाग घेण्याच्या अनुषंगाने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियाना संदर्भात शासन स्तरावरुन पूर्वी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय अधिक्रमित करुन नवीन दिनांक २५/४/२०१८ च्या शासन निर्णयान्वये तसेच, त्यानंतर दिनांक २३/७/२०१९ व दिनांक २५/११/२०२१ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सन २०२०-२१-२२ मधील जिल्हा परिषद गटस्तर स्पर्धा पूर्ण होऊन निकाल जाहीर करण्यात आले आहेत. तसेच, सन २०१८-१९ व २०१९-२० मधील राज्यस्तर स्पर्धा तपासणी सुरु आहे.

संपूर्ण ग्रामीण स्वच्छता शाश्वत टिकविण्याच्या अनुषंगाने स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत, ग्रामीण भागातील सार्वजनिक शौचालय संकुलाचे बांधकाम, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबरधन,मैला गाळ व्यवस्थापन,प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन अशा प्रकारे राज्यामध्ये सुरू असणारी ही सर्व कामे पुर्ण करून, राज्यास हागणदारी मुक्त अधिक (ODF PLUS) म्हणून घोषित करावयाचे आहे. या सर्व कामांना गतिमान करण्यासाठी,ग्रामस्थांनी व अधिकाऱ्यांनी या कामात दिलेल्या सहभागाला प्रोत्साहित करण्यासाठी,संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानातील स्पर्धेत यथोचित बदल करून, सन २०२२-२३ व त्यापुढील अभियाना करीता दिनांक ७/११/२०२२ च्या शासन निर्णयान्वये नव्याने एकत्रित सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(७) <u>जलस्वराज्य टप्पा-२</u> :-

राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता सेवा सुविधांचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व शाश्वतता इत्यादी बाबी साध्य करण्याकरिता राज्यात जागतिक बँकेच्या सहाय्याने जलस्वराज्य-२ कार्यक्रम ६ वर्षे (२०१४-२०२०) कालावधीत १२ जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे. या संदर्भातील सर्वसमावेशक सूचना समाविष्ट असलेला शासन निर्णय दिनांक ४.१.२०१४ रोजी निर्गमित करण्यात आला होता. जागतिक बँकेद्वारे जलस्वराज्य-२ कार्यक्रमास दिनांक ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत सहा महिने मुदतवाढ देण्यात आली होती.

जागतिक बँकेकडून मिळणारे ७० टक्के अर्थसहाय्य (उर्वरित ३० टक्के राज्य शासनाकडून) हे **प्रोग्राम फॉर रिझल्ट** या वित्तीय साधनांतर्गत उपलब्ध होणार असून उद्दिष्टपुर्ती आधारित निधी संवितरण निर्देशकांशी (Disbursement Linked Indicators-DLI) निगडीत आहे. असा उपक्रम राबविणारे **महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.**

(८) <u>जल जीवन मिशन</u> :-

सन २०१९ पासून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची पुनर्रचना करून जल जीवन मिशनची सुरवात करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या जल जीवन मिशनच्या कार्यरत मार्गदर्शक सूचनांनुसार, सन २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे कमीत कमी ५५ लिटर प्रति

माणसी, प्रति दिन गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

जल जीवन मिशनच्या राज्यात अंमलबजावणीकरीता राज्यस्तरावर राज्य पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हास्तर पाणी व स्वच्छता मिशन कार्यान्वयन यंत्रणा आहे. ग्राम पातळीवर जल जीवन मिशन अंतर्गत कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती यंत्रणा म्हणून ग्रामीण पाणी व स्वच्छता समिती काम करेल. जल जीवन मिशन अंतर्गत घ्यावयाच्या योजनांच्या आराखड्यांना जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनने मान्यता दिल्यानंतर सदर आराखड्यास मा. पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने मान्यता देणे आवश्यक आहे. या आराखड्यांना राज्यस्तरावर मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखालील समितीची मान्यता घेण्यात येते. राज्यातील ग्रामीण भागात या मिशन अंतर्गत सन २०२४ पर्यंत एकुण १.४२ कोटी कुटुंबांना लाभ देण्याचे लक्ष्य आहे.

(९) <u>जागतिक बँक अर्थसहाय्यित जलविज्ञान प्रकल्प</u>

जागतिक बँकेच्या अर्थसहायाने केंद्र शासनामार्फत जलविज्ञान प्रकल्प राबविण्यात येत असून, या प्रकल्पांतर्गत राज्यात भूजलाच्या बाबतीत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत विविध विकास कामे हाती घेण्यात आलेली आहेत. या जलविज्ञान प्रकल्पाचा विस्तार राष्ट्रीय पातळीवर करण्यात आला असून, आता हा प्रकल्प राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प या नावाने राबविण्यात येत आहे.

राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पांतर्गत प्राप्त होणारा निधी सन २०१६-२०१७ ते सन २०२३-२०२४ असा ८ वर्षासाठी १००% अनुदान स्वरुपात असून, केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी घटकनिहाय रुपये ३६.०० कोटी एवढा निधी मांजूर केला आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार महाराष्ट्र राज्याचा भूजल प्रकल्प कृती आराखडा रु.३६.०० कोटीवरून रु.२७.०० कोटी इतका करण्यात आला आहे.

राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पांतर्गत जलशास्त्रीय माहिती प्रणाली, पूर नियंत्रणासाठी निर्णय सहाय्य प्रणाली, जलसंपत्तीचे संवर्धन या प्रकारची कामे हाती घ्यावयाची असून, जादा खोलीच्या विंधण छिद्र किंवा कूपनलिकांची दुरूस्ती किंवा पुनरूज्जीवन करणे, व्हिडीओ कॉन्फरन्स साठी साहित्य घेणे, यंत्रणेतील अधिकाऱ्यांना जलविज्ञान प्रकल्पासाठी उपयुक्त प्रशिक्षण देणे, भूजलाविषयी जनजागृती मोहिम राबविणे या बाबी शिघ्र गतीने राबविण्यासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने सादर केलेल्या कृती आराखड्यास सुधारित प्रशासकीय मान्यता पाणी पुरवठा व स्वच्छता विभागा, शासन निर्णय दिनांक १० नोव्हेंबर, २०२० अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

**<u>महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार सेवा पुरविणे</u> :-**

राज्यातील पात्र व्यक्तींना/संस्थांना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ पारित करण्यात आला असून त्यातील तरतुदींनुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत खालीलप्रमाणे एकुण १६ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | सेवा पुरविण्यासाठीचा कालावधी (कामाचे दिवस) | निर्देशित अधिकारी | प्रथम अपिल अधिकारी | द्वितीय अपिल अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मजीप्रामार्फत चालविण्यात येत असलेल्या पाणी | ३० दिवस सर्व कागदपत्रांच्या पुर्ततेसह परिपुर्ण | संबंधित कार्यकारी अभियंता | अधिक्षक अभियंता | मुख्य अभियंता |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | पुरवठा केंद्राअंतर्गत ग्राहकांना नळ जोडणी देणे. | अर्ज सादर केल्यानंतर | | | |
| २ | पाणी बीलासंबंधी तक्रारीचे निवारण करणे | ३० दिवस | संबंधित कार्यकारी अभियंता | अधिक्षक अभियंता | मुख्य अभियंता |

तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत एकुण दोन सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत.

| **अ.क्र.** | **लोकसेवेचे नाव** | **सेवा पुरविण्यासाठीचा कालावधी (कामाचे दिवस)** | **निर्देशित अधिकारी** | **प्रथम अपिल अधिकारी** | **द्वितीय अपिल अधिकारी** |
|---|---|---|---|---|---|
| १ | विंधन विहिर/विहिर स्थळ सर्वेक्षण (भुजलीय आणि भूभौतिक) | ३० दिवस | कनिष्ठ भूवैज्ञानिक/सहायक भूवैज्ञानिक (वरिष्ठ भूवैज्ञानिक जिल्हा कार्यालयातील) | जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक | विभागीय उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा. |
| २ | पाणी नमुन्याचे रासायनिक व जैविक पृथ:करण | ३० दिवस | जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयातील रसायनी | जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक | विभागीय उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा. |
| ३ | नवीन नळ जोडणी | १५ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| ४ | मालकी हक्कात बदल करणे | ७ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| ५ | नळ जोडणी आकारामध्ये बदल करणे | १५ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| ६ | तात्पुरते/कायम स्वरूपी नळ जोडणी खंडित करणे | ७ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| ७ | पुन: जोडणी करणे | १५ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| ८ | वापरामध्ये बदल करणे | १५ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | पाणी देयक तयार करणे | ३ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १० | प्लंबर परवाना | १५ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| ११ | प्लंबर परवाना नूतनीकरण करणे | १५ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १२ | थकबाकी नसल्याचा दाखला | ३ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १३ | नादुरूस्त मीटर तक्रार करणे | ७ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १४ | अनधिकृत नळजोडणी तक्रार | ७ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १५ | पाण्याची दबाव क्षमता तक्रार | ३ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १६ | पाण्याची गुणवत्ता तक्रार | ३ दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १७ | पाणी बिलासंबंधी तक्रारीचे निवारण करणे | ३० दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १८ | नळ जोडणी स्थलांतरित करणे | ३० दिवस | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |

**पाणी टंचाई निवारणार्थ करावयाच्या उपाययोजना :-**

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील कलम २५ व २६ च्या तरतुदीनुसार संबंधित जिल्हयाचे प्राधिकरण पावसाळयाच्या कालावधीत किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी भूजल सर्वेक्षणव विकास यंत्रणेच्या सल्ल्यानुसार किंवा पावसाचे प्रमाण व स्वरुप आणि पाणलोट क्षेत्रातील पाण्याच्या पातळीची माहिती किंवा अन्य कोणतीही संबंधित बाब लक्षात घेऊन एका वेळी एक जल वर्षापेक्षा अधिक नाही अशा कालावधीकरिता अशा क्षेत्रास पाणी टंचाई घोषित करता येते. अशा ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी विहित उपाययोजना राबविण्यात येतात.

राज्यातील ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ या विभागाच्या दिनांक ३.२.१९९९ च्या शासन निर्णयान्वये स्थायी आदेशाद्वारे सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. टंचाई निवारणाकरिता खालील अनुज्ञेय उपाययोजनांपैकी योग्य त्या उपाययोजना राबविण्यात येतात.

१) बुडक्या घेणे.
२) विहिर खोल करणे, विहिरीतील गाळ काढणे.
३) खाजगी विहिरींचे अधिग्रहण करणे.
४) टँकर / बैलगाडीद्वारे पाणी पुरवठा करणे.
५) प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजनेची कामे तातडीने पुर्ण करणे.
६) नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे.
७) विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे.
८) विंधण विहिरी घेणे.
९) तात्पुरत्या पुरक नळ योजना घेणे.
१०) धरणामध्ये अथवा तलावामध्ये चर खणणे.

तथापी शासन निर्णय क्रमांक टंचाई २०२२/ प्र.क्र.३८/पापु-१४ दिनांक २०.०४.२०२२ अन्वये राज्यात टंचाई परिस्थितीत टँकरचे अधिकार उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहे.

**सामाजिक बांधिलकी :-**

१) ग्रामीण भागातील जनतेमध्ये स्वच्छतेसंदर्भात जनजागृती निर्माण करणे.
२) ग्रामीण जनतेस पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे.
३) सेवेच्या गुणवत्तेत व तत्परतेत सामाजिक बांधिलकी ठेवणे.
४) नागरीकांशी सौजन्यपुर्ण व मदतीची वृत्ती ठेवणे.
५) कामकाजाचा वेळेत निपटारा करणे.
६) कामात पारदर्शता व निष्ठा ठेवणे.

**नागरीकांची जबाबदारी :-**

१) पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांतर्गत निर्माण झालेली मालमत्ता ही राष्ट्रीय संपत्ती समजून तीचे रक्षण व जतन करणे.
२) पिण्याचे पाणी ही नैसर्गिक संपत्ती समजून तिचा जाणीवपुर्वक काटकसरीने वापर करणे.
३) पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत प्रदुषित होणार नाहीत याची काळजी घेऊन त्यांचे संवर्धन करण्यास मदत करणे.
४) पाणीपट्टी नियमितपणे व वेळेत भरणे.
५) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेशी नागरीकांची वर्तणूक सौजन्यपुर्ण असावी.
६) नागरीकांचा प्रतिसाद विकासाला पुरक व सकारात्मक असावा.
७) नागरीकांनी कायदेशीर तरतुदी, नियम व अलिखित संकेत यांचे पालन करावे.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागासाठी http://water.maharashtra.gov.in ही वेबसाईट असून त्यावर विभागाची इतर महत्वाची माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरीकांचे अभिप्राय व सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल.

**********************************